RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ११५ ] बुधवार, सप्टेंबर ९, २०२६/भाद्रपद १८, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३८८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## पाटबंधारे विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ , दिनांक ९ सप्टेंबर, २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक बीसीएस-२०२६/प्र.क्र.७७/आ(संनि).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ चे परंतुक आणि भारताच्या राष्ट्रपतींचे दिनांक १७ फेब्रुवारी १९८० चा आदेश क्रमांक जी. एस. आर(४७)(इ) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले आणि राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेले सर्व विद्यमान नियम व आदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागातील "महाराष्ट्र अभियांत्रिकी यंत्र अभियंता सेवा, वर्ग-२" यातील "उप अभियंता (यांत्रिकी)" या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत—

**१.** या नियमास पाटबंधारे विभागातील "महाराष्ट्र यांत्रिकी अभियंता सेवा, वर्ग-२ मधील उप अभियंता (यांत्रिकी) (सेवाप्रवेश ) नियम, २०२६" असे म्हणता येईल.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात —

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) "पदवी" म्हणजे एखाद्या सांविधिक विद्यापीठाची "पदवी" आणि "पदविका" म्हणजे शासनाने मान्यता दिलेली पदविका ;

(क) "पाटबंधारे विभाग" म्हणजे शासनाचा पाटबंधारे विभाग ;

(ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(इ) "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे शासनाने मान्यता दिलेली संस्था.

**३.** पाटबंधारे विभागातील, महाराष्ट्र यंत्र अभियंता सेवा, वर्ग-२ यातील "उप अभियंता (यांत्रिकी)" या पदावरील नियुक्ती ही एक तर —

(अ) पाटबंधारे विभागात "कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)" हे पद धारण करणाऱ्या आणि

(एक) ती पदवीधर असेल तर कमीत कमी तीन वर्ष ;

(दोन) ती तीन वर्षांच्या पाठ्यक्रमानंतर दिली जाणारी पदविका धारण करीत असेल तर कमीत कमी आठ वर्षे ;

(तीन) ती दोन वर्षांच्या पाठ्यक्रमानुसार दिली जाणारी पदविका धारण करीत असेल तर कमीत कमी दहा वर्षे ;

(चार) ती अशी कोणतीही अर्हता धारण करीत नसेल, तर, कमीत कमी तेरा वर्षे इतकी केवळ सेवा केलेल्या केवळ योगायोग म्हणून नव्हे तर रीतसर अखंड सेवा केलेल्या योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन.

**किंवा**

(ब)(एक) आधीपासूनच शासनाच्या सेवेत नसल्यास ज्याचं वय जास्तीत जास्त बत्तीस वर्षे असेल अशा,

(दोन) जिने एखाद्या सांविधिक विद्यापीठाची किंवा मान्यताप्राप्त संस्थेची यांत्रिकी, अभियांत्रिकी मधील पदवी किंवा शासनाने त्यास समकक्ष घोषित केलेली अन्य अर्हता, धारण केलेली आहे अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे करण्यात येईल.

**४.** या पदावर पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्तीचे प्रमाण २.१ असे असेल :

परंतु, पदोन्नतीने भरल्या जाणाऱ्या रिक्त पदांची विभागणी पदवीधर कनिष्ठ अभियंते (यांत्रिकी) आणि इतर यांच्यामध्ये समप्रमाणात करण्यात येईल

आणखी असे की, निकड लक्षात घेऊन तसे करणे आवश्यक झाले आहे असे शासनाचे मत झाल्यास त्याबाबतीत शासनास, आवश्यक त्याबाबतीत आयोगाशी विचार विनिमय करून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यासंबंधात या नियमात विहित केलेली टक्केवारी शिथिल करुन, उप अभियंता (यांत्रिकी) पदावर नियुक्त्या करता येतील.

**५.** नामनिर्देशनाद्वारे या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या मुदतीसाठी परिविक्षाधीन असेल.

**६.** पदोन्नतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, ती त्याबाबतीत केलेल्या नियमानुसार विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा आधीच उत्तीर्ण झालेली नसेल, किंवा तिला अशा परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळालेली नसेल तर तिने अशा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

**७.** अभियांत्रिकी अर्हता असणारी या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, तिला तसे करण्यास भाग पाडण्यात आल्यास कोणत्याही संरक्षण सेवेत किंवा भारताच्या संरक्षणाशी संबंधित अशा पदावर भारतात किंवा विदेशात कोणत्याही ठिकाणी सेवा करण्यास, भारत सरकार वेळोवेळी ठरवून देईल अशा अटीवर, प्रशिक्षणावर कोणताही कालावधी घालविला असल्यास तो धरुन, कमीत कमी चार वर्षे इतक्या कालावधीसाठी पात्र असेल :

परंतु, अशा व्यक्तीस, तिच्या नियुक्तीच्या तारखेपासून दहा वर्षाची मुदत संपल्यानंतर वरीलप्रमाणे सेवा करावी लागणार नाही आणि सर्वसाधारणपणे ती चाळीस वर्षाची झाल्यानंतर तिला उपरोक्त प्रमाणे सेवा करावी लागणार नाही.

**८.** या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. बा. घाडगे,**
शासनाचे सहसचिव.

## IRRIGATION DEPARTMENT

Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 9th September, 2026.

*NOTIFICATION*

Constitution Of India.

No. BCS-2026/C.R.77/EStt.(C.R.).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India read with Order No.G.S.R. 47(E), dated the 17th February 1980, of the President of India and in supersession of all the existing rules and orders made in this behalf and in force in the State or any part thereof, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of "Deputy Engineer (Mechanical)" in the Maharashtra Service of Mechanical Engineers, Class II in the Irrigation Department of the Government of Maharashtra, namely —

**1.** These rules may be called "The Deputy Engineer (Mechanical) in the Maharashtra Service of Mechanical Engineers, Class II in the Irrigation Department (Recruitment) Rules, 2026."

**2.** In these rules, unless the context requires otherwise,—

*(a)* "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

*(b)* "degree" means a degree of a statutory University and "diploma" means a diploma as recognised by Government;

*(c)* "Irrigation Department" means the Irrigation Department of Government;

*(d)* "Government" means the Government of Maharashtra ;

*(e)* "recognised institution" means an institution recognised by Government.

**3.** Appointment to the post of "Deputy Engineer (Mechanical)" in the Maharashtra Service of Mechanical Engineers, Class II, in the Irrigation Department shall be made either-

*(a)* by promotion of a suitable person holding the post of Junior Engineer (Mechanical) in the Irrigation Department having non-fortuitous continuous Service of not less than,—

*(i)* three years, if he holds a degree;

*(ii)* eight years, if he holds a diploma awarded after a three-year course;

*(iii)* ten years, if he holds a diploma awarded after a two-year course;

*(iv)* thirteen years, if he does not hold any such qualification; or

*(b)* by nomination from amongst candidates who —

*(i)* unless already in the service of Government are not more than thirty-two years of age ;

*(ii)* Possess a Bachelor's Degree in Mechanical Engineering of a statutory University or any recognized institution or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

**4.** The appointment to the post by promotion and by nomination shall be the in ratio of 2:1:

Provided that, the vacancies in the promotion quota shall be divided equally between Graduate Junior Engineers (Mechanical) and others:

Provided further that, where in the opinion of Government the exigencies of service so require, Government may, after consultation with the Commission wherever necessary, make appointments to the post of Deputy Engineer (Mechanical) in relaxation of the percentage prescribed in this rule for recruitment by nomination.

**5.** A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of two years.

**6.** A person appointed to the post whether by promotion or by nomination shall be required to pass the Departmental Examination and examinations in Hindi and Marathi according to the rules made by Government in that behalf, unless he has passed, or has been exempted from passing such examinations.

**7.** A person appointed to the post, possessing engineering qualifications, shall if so required be liable to serve in any Defence Service or post connected with the Defence of India anywhere in India or abroad for a period of not less than four years inclusive of the period spent on training, if any, on such conditions as may be determined by the Government of India from time to time:

Provided that, such person shall not be required to serve as aforesaid after the expiry of ten years from the date of his appointment and shall not ordinarily be required to serve as aforesaid after he has attained the age of forty years.

**8.** A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. B. GHADGE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.